आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
बुधवार दिनांक २३ एप्रिल २०२५

ठळक बातम्या

1. पहलगाम दहशतवादी हल्लेखोरांचा शोध जारी, पर्यटकांना सुरक्षित परत आणण्याला सर्वोच्च प्राधान्य देणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.

2. देशातल्या सर्व राजकीय पक्षांनी केला पहलगाम हल्ल्याचा निषेध, दहशतवादाच्या विरोधात साऱ्या जगाचा भारताला पाठिंबा.

3. पुण्याच्या एफ.टी.आय.आय. आणि कोलकत्यातल्या 'सत्यजित रे' चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्थेला अभिमत विद्यापीठाचा दर्जा प्रदान.

4. विदर्भातील नागपूर, चंद्रपूर, वर्धा आणि अमरावती या जिल्ह्यांमध्ये उद्या उष्णतेच्या लाटेचा ऑरेंज अलर्ट जारी.

पहलगाम मदत क्रमांक

काश्मीरमधे पहलगाम इथं काल झालेल्या दहशतवादी हल्ल्याबद्दल सर्वत्र तीव्र निषेधाची लाट उमटली आहे. या हल्ल्यात आतापर्यंत मिळालेल्या माहितीनुसार २७ जणांचा बळी गेला असून त्यातले बहुसंख्य पर्यटक होते. महाराष्ट्रातल्या ६ पर्यटकांचा या हल्ल्यात मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे. मृतांच्या कुटुंबीयांना 5 लाख रुपयांची आर्थिक मदत राज्य सरकारने जाहीर केली असून जखमींना 50,000 रुपयांची मदत जाहीर केली आहे.महाराष्ट्रातील अडकलेल्या पर्यटकांना परत आणण्यासाठी एक विशेष विमान वापरण्यात येणार आहे आणि त्याचा खर्च राज्य सरकारतर्फे करण्यात येईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं आहे. याशिवाय पर्यटकांना राज्यात परत आणण्यासाठी प्रयत्न केले जात आहे -

*(अभी भी कोई परेशानी का सामना कर रहे हैं, उन सबको महाराष्ट्र में लाने के लिए हम लोग व्यवस्था करेंगे। आज भी इंडिगो ने एक मुंबई के लिए स्पेशल अलग फ्लाइट एक ऍडिशनल फ्लाइट मुंबई के लिए दिल्ली के लिए अलग अलग भागों के लिए उन्होंने रखी है। उसमें भी हमने कई लोगों को अड्जस्ट करवाया है ताकि वो वापस आ पाए और हमारा प्रयास होगा की ये एक दो दिनों में सबको हम लोग वापस लेकर आते है)*

पहलगाम आणि जम्मू काश्मीरमधे पर्यटकांच्या मदतीसाठी विशेष कक्ष स्थापन करण्यात आला असून हेल्पलाईन क्रमांक उपलब्ध आहेत. ते याप्रमाणे. ०१९३२२२२३३७, ७७८०८८५७५९, ९६९७९८२५२७, आणि ६००६३६५२४५. दरम्यान, लष्कर ए तैयबा या दहशतवादी संघटनेच्या द रेझिस्टन्स फ्रंट या गटानं या हल्ल्याची जबाबदारी घेतली आहे. दरम्यान, या भ्याड हल्ल्याच्या सूत्रधारांना पकडण्यासाठी सुरक्षा दलांनी शोधमोहीम तीव्र केली आहे. संशयित दहशतवाद्यांची रेखाचित्रं तयार करुन सर्वत्र कसून शोध घेण्यात येत आहे. पर्यटकांवर हल्ला झाल्याच्या निषेधार्थ जम्मू काश्मीरमधे आज बंद पाळण्यात येत आहे. विविध राजकीय पक्ष आणि संघटनांतर्फे या हल्ल्याच्या निषेधात शांततापूर्ण निदर्शनं करण्यात येत आहेत. तत्पूर्वी सकाळी पहलगाम, दक्षिण काश्मीरमधे अनंतनाग, कुलगाम आणि इतर जिल्ह्यांमधे सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, नायब राज्यपाल मनोज सिन्हा , जम्मू काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी आज श्रीनगरमध्ये पोलीस नियंत्रण कक्षात पहलगाम  दहशतवादी हल्यात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना पुष्पांजली अर्पण केली. यावेळी अमित शहा यांनी मृतांच्या कुटुंबियांशी संवाद साधून त्यांचं सांत्वन केलं. मृतांचं पार्थिव विशेष विमानानं श्रीनगरहून त्यांच्या मूळ ठिकाणी पाठवलं जात आहे. यानंतर गृहमंत्र्यांनी पहलगामजवळ बैसरन इथं प्रत्यक्ष हल्ल्याच्या ठिकाणी जाऊन पाहणी केली.

<u>पहलगाम-राजनाथ सिंह</u>

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आज तिन्ही दलांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत काश्मीर खोऱ्यातल्या परिस्थितीचा आढावा घेतला. लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी, नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश त्रिपाठी आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सध्याच्या स्थितीची माहिती सिंह यांना दिली.

<u>के.राममोहन नायडू</u>

पहलगाम इथे काल झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय नागरी विमानवाहतूक मंत्री के. राममोहन नायडू यांनी गृहमंत्री अमित शहा यांच्याशी श्रीनगरहून दिल्ली आणि मुंबईसाठी अधिक विमान उड्डाणं आयोजित करण्याविषयी चर्चा केली. नायडू यांनी सर्व विमान कंपन्यांसोबत तातडीची बैठक घेतली. विमान कंपन्यांना नियमित भाडे पातळी राखण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या पर्यटकांचे मृतदेह त्यांच्या मूळ राज्यात पोहोचवण्यासाठी पूर्ण सहकार्य करण्याचे निर्देशही नायडू यांनी

विमान कंपन्यांना दिले. दिल्ली आणि मुंबईसाठी प्रत्येकी दोन अशा चार उड्डाणांची व्यवस्था करण्यात आल्याची माहिती, नागरी विमान वाहतूक मंत्रालयाने दिली आहे.

काँग्रेस, मनसे सरकारच्या पाठीशी

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे आणि काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी या दहशतवादी हल्ल्यासंदर्भात अमित शहा यांच्याशी चर्चा केली, आणि दहशतवाद विरोधी लढाईत काँग्रेस पक्ष, केंद्र सरकारच्या पूर्ण पाठीशी असल्याचं सांगितलं. दहशतवाद्यांना कडक शासन झालं पाहीजे, असं खरगे यांनी सामाजिक माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे, तर या हल्ल्यात बळी पडलेल्यांच्या कुटुंबाला न्याय मिळायला हवा असं राहुल गांधी यांनी म्हटलं आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनंही या दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध व्यक्त केला आहे. ही घटना अतिशय गंभीर असून, या प्रसंगात आपण सरकारच्या पाठीशी पूर्णपणे उभं असल्याचं पक्षाचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी म्हटलं आहे.

भारताला पाठिंबा

पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या जगभरातल्या नेत्यांनी तीव्र निषेध करत, भारताला पाठिंबा दर्शवला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी या हल्ल्याचा निषेध करत दहशतवादा विरोधातल्या लढाईत अमेरिका भारतासोबत असल्याचं म्हटलं आहे. त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केली आणि या हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्यांबद्दल शोक व्यक्त केला. ब्रिटनचे पंतप्रधान केअर स्टारमर यांनी हा हल्ला विनाशकारी असल्याचं म्हणत, हल्ल्यातले पीडित आणि भारतीय नागरिकांसोबत सहवेदना व्यक्त केल्या आहेत.

जर्मनीचे चान्सलर ओलाफ शोल्झ यांनी या हल्ल्याचा निषेध केला असून या हल्ल्यातले जखमी लवकर बरे व्हावेत अशी प्रार्थना त्यांनी केली आहे. डेन्मार्कच्या पंतप्रधान मेटे फ्रेडरिकसेन यांनी या कठीण काळात भारतासोबत असल्याचं म्हटलं आहे. इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांनीही या हल्लाच्या तीव्र निषेध केला आहे. युरोपियन आयोगाच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयन यांनीही या संकटात युरोप भारतासोबत खंबीरपणे उभा असल्याचं म्हटलं आहे. गयानाचे राष्ट्राध्यक्ष इरफान अली यांनी या हल्ल्याला घृणास्पद कृत्य म्हणत, या हल्ल्याचा निषेध केला आहे. ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांनी हिंसाचाराचं समर्थन करता येणार नाही असं म्हणत या हल्ल्याचा निषेध केला. न्यूझीलंडचे परराष्ट्र व्यवहार मंत्री विन्स्टन पीटर्स यांनी काश्मीरमधील

दहशतवादी हल्ल्याचा निषेध करत, भारताला पाठिंबा दर्शवला आहे. भारतातल्या युक्रेन दूतावासानं या हल्ल्याबद्दल चिंता व्यक्त केली आहे.

एफ.टी.आय.आय.

केंद्रीय शिक्षण मंत्रालयानं पुणे इथली भारतीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्था अर्थात एफ.टी.आय.आय. आणि कोलकत्यातल्या सत्यजित रे चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्थेला अभिमत विद्यापीठाचा दर्जा प्रदान केला आहे. या संदर्भातली अधिसूचना शिक्षण मंत्रालयानं काल जारी केली. विद्यापीठ अनुदान आयोगानं केलेल्या शिफारशीनुसार या दोन्ही संस्थांना अभिमत विद्यापीठाचा दर्जा दिला गेल्याचं अधिसूचनेत म्हटलं आहे.

आशिष सातपुते

कोल्हापूरच्या राजश्री शाहू स्मारक भवन इथं डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून आकाशवाणी नागपूरचे प्रसारण अधिकारी आशिष सातपुते यांना त्यांच्या विविध सृजनशील कार्यांच्या बद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय विचार प्रेरणा पुरस्कार प्रदान करण्यात आला.मानाचा फेटा, स्मृतीचिन्ह, मानपत्र तसेच पुस्तक असे पुरस्काराचे स्वरूप होते.

हवामान

विदर्भातील नागपूर, चंद्रपूर, वर्धा आणि अमरावती या जिल्ह्यांमध्ये उद्या उष्णतेच्या लाटेचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला असून, परवा नागपूर, चंद्रपूर, अमरावती आणि अकोला या ठिकाणी उष्णतेच्या लाटेचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. नागपूरच्या प्रादेशिक हवामान केंद्रानं वर्तवल्यानुसार आज देखील विदर्भाच्या अनेक जिल्ह्यांमध्ये प्रचंड उष्मा जाणवतो आहे. दरम्यान आज 45.8 अंश सेल्सिअस सह चंद्रपूर जिल्हा सर्वात उष्ण ठरला असून, अकोला इथं 44.8 अमरावती इथे 44. 4, वर्धा आणि नागपूर इथं 44.2 तर यवतमाळ आणि गडचिरोली इथं 44 अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली आहे.

आयपीएल टी ट्वेंटी

आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज सनरायझर्स हैद्राबाद आणि मुंबई इंडियन्स संघादरम्यान हैद्राबाद इथे सामना खेळला जाणार आहे. लखनौ इथे काल झालेल्या साखळी सामन्यात दिल्ली कॅपिटल संघाने लखनौ सुपर जायंट्स संघाचा ८ गडी राखून पराभव केला.

आयएसएसएफ

आयएसएसएफ ISSF अर्थात आंतरराष्ट्रीय नेमबाजी क्रीडा महासंघानं आयोजित केलेल्या अजिंक्यपद स्पर्धेत भारतानं सात पदकं जिंकत तिसरं स्थान पटकावलं आहे. यात दोन सुवर्ण, चार रौप्य आणि एका कांस्य पदकाचा समावेश आहे. सिमरनप्रीत कौर ब्रार हिनं २५ मीटर पिस्टल प्रकारात रौप्य पदक पटकावत स्पर्धेचा शेवट गोड केला. अमेरिका एकूण सात पदकं जिंकत स्पर्धेत दुसऱ्या स्थानावर आहे, तर चीनने चार सुवर्ण, तीन रौप्य आणि सहा कांस्य पदकांची लयलूट करत स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला.

सीजीएचएस

केंद्र सरकारच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या अंतर्गत केंद्र सरकार आरोग्य योजना (CGHS),ही एक प्रमुख योजना असून त्यातील आरोग्य व्यवस्थापन माहिती प्रणाली (HMIS) अद्ययावत करून त्यात मोठे डिजिटल परिवर्तन आणले जात आहे. सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ **ॲ**डव्हान्स्ड कॉम्प्युटिंग (सी-डॅक) द्वारे विकसित केलेला, हा सर्वसमावेशक डिजिटल प्लॅटफॉर्म 28 एप्रिल 2025 पासून थेट उपलब्ध होणार आहे. सुसंबद्धपणे याची कार्यवाही सुनिश्चित करण्यासाठी, कल्याण केंद्रांमधील सर्व CGHS सेवा 26 एप्रिल 2025 (शनिवार) रोजी एक दिवसासाठी बंद राहतील.

******